डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/ठेकामजूर/189/२०२२ दिनांक :— 07 SEP 2022

**जाहीर नोटीस**

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. **०१/१०/२०२२**ते दि. **३१/१२/२०२२**या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावेआपले दरपत्रकदि. २२.०९.२०२२पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ — या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | भात, भूईमूग व नागली पिकांमधील खेड व गवत काढणे, किटकनाशक तसेच बुरशीनाशकाची फवारणी करणे, भात पिकाची कापणी करून झोडणी करणे, नाचणी पिकाची कापणी करून मळणी करणे, भूईमूग पिकाची काढणी करून तोडणी करणे, प्रक्षेत्रावरील पिकांना पाणी देणे, खते घालणे, नारळ फळे गोळा करणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| ०३ | प्रक्षेत्र | नांगरणी व रोटाव्हेटर मारून रब्बी हंगामासाठीचे प्लॅाट लागवडीसाठी तयार करणे, कलिंगड लागवडीसाठी गादी वाफे तयार करून त्यावर पॉलीथीन पेपर अंथरणे व पेरणी करणे. तसेच उद्धिष्ठांनुसार विविध पिकांच्या ( भूईमूग, चवळी, कुळीथ, इ. ) बिजोत्पादन लागवडीसाठी वाफे/अळी/स—या तयार करणे. तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे/रोपे इत्यादींना पाणी घालणे, किटकनाशक तसेच बुरशीनाशकाची फवारणी/आळवणी करणे, फूट काढणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०२ |
| ०५ | नर्सरी | आंबा कलमे चरात ठेवण्यासाठी चर खणणे, चरामध्ये खते टाकून आंबा कलमे ( विविध जाती ) चरात ठेवणे. चर खणून नारळ बियाणे रूजत घालणे, मातृवृक्ष बागांची साफसफाई करणे, पाणी देणे, व नविन इमारतीसभोवार स्वछता ठेवणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| | | **एकूण** | **१४** |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :—**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२.३० व दुपारी ०२ ते ०५.३० )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा. ( सका. ९.०० ते ०१.३० व दुपारी ०२ ते ०५.३० )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

**कार्यक्रम समन्वयक,**
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,
ता. लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :—**

१. मा. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना विनंती करण्यात येते की, सदर जाहीर नोटीस चा मसुदा विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करून मिळावा.
२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली

*/— सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.*

Scanned with OKEN Scanner